# जाहिर ई - निविदा सूचना

## कार्यालयाचे नाव –**चिपळूण नगर परिषद, ता - चिपळूण, जि.- रत्नागिरी**

## **जाहिर ई** - निविदा मागविणारे **सूचना क्र.** ३१ **सन २०२६-२७**

मुख्याधिकारी चिपळूण नगर परिषद, जि.रत्नागिरी खालील नमूद केलेल्या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागवित आहेत.

**कामाचे संक्षिप्त वर्णन**

| अ. क्र. | कामाचा तपशील | कामाची अंदाजित रक्कम | कामाची बयाणा रक्कम | निविदा फॉर्म शुल्क | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | चिपळूण नगर परिषद हद्दीमधील चिपळूण नगर परिषदेच्या मालकीचे असलेले जागेमध्ये लावण्यात आलेल्या वृक्षांचे वृक्षसंगोपन करणे इत्यादी देखभाल व साफसफाई करणेसाठी १३ अकुशल व १ कुशल मजूर ठेकेदार पद्धतीने पुरविणे. | ४६,५०,१५५/- | ४६,५०२/- | ५०००/- | कामाचे आदेश दिल्यापासून ११ महिने |

**निविदा प्रक्रियेची तारीख व वेळ**

| अ. क्र. | निविदा प्रक्रियेचे स्वरूप | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन टेंडर प्रसिध्दी | १२ /०५/२०२६ | सकाळी १० वा.पासून |
| २. | ऑनलाईन निविदा डाऊनलोड करणेचा सुरुवात कालावधी | १२ /०५/२०२६ | सकाळी १० वा. पासून |
| ३. | निविदापूर्व बैठकीची तारीख व वेळ | १८ /०५/ २०२६ | सायंकाळी ४ वाजता |
| ४. | ऑनलाईन निविदा भरणेचा सुरुवात कालावधी | १२ /०५/२०२६ | सकाळी १० वा. पासून |
| ५. | ऑनलाईन निविदा भरणेचा समाप्त कालावधी | २५ /०५/२०२६ | सायंकाळी ५ वाजेपर्यंत |
| ६. | ऑनलाईन निविदा उघडणेचा टेक्नीकल (पार्ट) कालावधी | २६ /०५/२०२६ | सायंकाळी ५ वाजता |

- **(लखोटा क्रमांक 1) मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील –**
  १. भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र व कर्मचारी राज्य विमा (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र.
  २. पॅनकार्ड झेरॉक्स प्रत
  ३. कामगार परवाना (Labour license): मजूर पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या कामगार विभागाचा परवाना
  ४. नोंदणीकृत संस्था किंवा व्यक्ती (नोंदणी प्रमाणपत्र) : शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदार असल्याचा परवाना (उदा. मजूर सहकारी संस्था किंवा नोंदणीकृत कंत्राटदार)
  ५. GST प्रमाणपत्र : वैध वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र.
  ६. शासकीय किंवा निमशासकीय संस्थेत उद्यान विषयक सेवा/मनुष्यबळ पुरविल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र.
  ७. आर्थिक क्षमतेबाबतचे बँकेचे प्रमाणपत्र
  ८. बिड कॅपसिटी प्रमाणपत्र
  ९. बयाणा रक्कम भरणा केल्याचे पावतीची प्रतिमुद्रा प्रत
  १०. प्रतिज्ञापत्र (Affidavit) : कंत्राटदार कोणत्याही शासकीय संस्थेने काळ्या यादीत (Blacklisted) टाकलेले नाही , याबद्दलचे 100 किंवा 500 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरचे नोटरीकृत शपथपत्र.
  ११. विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र – प्रपत्र अ, ब आणि क (निविदेसोबत अपलोड केला आहे.)

- **अटी व शर्ती -**

१. निविदा कागदपत्रांचा तपशील https://www.mahatenders.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदाधारकांनी त्यांच्या बोली ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

३. निविदा फॉर्म शुल्क व इसारा (बयाणा) रक्कम ऑनलाईन भरणेत यावी. शासनाचे निर्देशानुसार ज्या संस्थांना अनामत रकमेचा भरणा करणेपासून शासनाने सवलत दिली असेल, अशा स्थितीमध्ये ज्या संस्थेची सर्वात कमी दराची निवीदा मंजूर होईल अशा संस्थेला करारनामा करतेवेळी निवीदा अनामत आणि निवीदा फॉर्मची रक्कम नगर परिषदेकडे भरावी लागेल.

४. सर्व कामगारांचे शारीरीकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या तंदुरूस्त असल्याबाबत शासकीय रूग्णालयाचे प्रमाणपत्र प्रत्यक्ष कामाची सुरूवात करण्यापुर्वी सादर करावयाचे आहे.

५. सर्व कर्मचाऱ्यांचे नावाची यादी तसेच सदर यादीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यांचे बँक खाते क्रमांक व नाव/पॅनकार्ड नंबर/ आधारकार्ड नंबर तसेच असल्यास भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक नमूद करावयाचे आहे. व्यवस्थापन सेवा ही यादीमधील नमूद कर्मचाऱ्यांमार्फत पुरवावयाची आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये कामगार बदलावयाचे झाल्यास नगर परिषदेची पुर्व परवानगी घेऊनच कार्यवाही करावी.

६. सेवेसाठी लागणारे मनुष्यबळ १० % अतिरिक्त असणे आवश्यक असून त्यांची पी.एफ. , ESIC संदर्भात आवश्यक असणारे आधारकार्ड व पॅनकार्डसह कर्मचाऱ्यांची यादी जोडणे आवश्यक आहे.

७. ठेका मंजुर झाल्यानंतर पहिल्या २ महिन्यांची देयके सेवा पुरवठादार यांनी स्वतः अदा करावयाचे आहेत व ही २ महिन्यांची देयकाची रक्कम त्यांना ठेक्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर देण्यात येतील.

८. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या २४ जुलै २०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे १ जानेवारी व १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर पुढील सहामाहीसाठी कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता याबाबत अंदाजपत्रकाची उजळणी करून नगरपरिषदेचे आदेशाप्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

९. कामाचा आदेश मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत कामगार आयुक्त कार्यालयाकडील परवाना नगर परिषदेकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची, ESIC रक्कम नियमानुसार सेवा पुरवठादार यांनी दर महिना भरावयाची आहे. सदर निधी भरल्याची संगणकीकृत प्रत सेवा पुरवठादार यांनी बिलासोबत सादर करावयाची आहे. शासनाचे नियमानुसार सेवा पुरवठादारास सूट/ सवलत मिळाल्यास तसे नगर परिषदेला त्वरीत कळविणे ही सेवा पुरवठादाराची जबाबदारी राहील.

११. कर्मचाऱ्यांना दिलेले वेतन ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या खात्यात दरमहा ७ तारखेच्या आत जमा केलेचे चलन बिलासोबत जोडणे आवश्यक आहे.

१२. सर्व कर्मचारी यांचा शासन नियमानुसार विमा उतरविणे बंधनकारक राहील व विमासंबंधी कागदपत्रे पुरवठादार यांनी प्रत्यक्ष कामाची सुरूवात करण्यापुर्वी सादर करावयाचे आहे. सदर विमा शासकीय विमा कंपनीमार्फत उतरविणे बंधनकारक आहे.

१३. कामगार कल्याण निधी हा दरमहा भरून बिलासोबत पावती सादर करण्यात यावी.

१४. निविदामधील नमूद संख्येइतके मजूर न पूरवल्यास प्रती मजूर/प्रती दिन २००/- रूपये दंड आकारण्यात येईल.

१५. निविदाधारकांनी प्रत्येक महिन्याचे वेतन हे दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कर्मचाऱ्यांना अदा करावयाचे आहे. मुदतीत वेतन अदा न केल्यास प्रतीदिन ५००/- रूपये दंड आकारण्यात येईल.

१६. सेवा पुरवठादार यांचे बिलातून नियमाप्रमाणे शासकीय कर व १० टक्के सुरक्षा अनामत रक्कम कापून घेण्यात येईल.

१७. सदरचे काम सेवा पुरविणे स्वरूपाचे असल्याने या कामाचे बिलामधून वस्तू व सेवा कर देण्यात येणार नाही व कपात करण्यात येणार नाही.

१८. सेवा पुरवठाधारकाला निविदा मंजुर दराप्रमाणे दरमहा बिलाची रक्कम चेकने अदा करण्यात येईल.

१९. सेवा पुरवठाधारकाला निविदा देकाराव्यतिरिक्त कोणताही शासकीय कर बिलावर आकारता येणार नाही. शासकीय सर्व कर आवश्यक असल्यास आवश्यक ते परवाने सेवा पुरवठादारकांनी स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणत्याही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

२०. लेखा परिक्षणामध्ये सदर कामाबाबत आक्षेप आल्यास अथवा जादा प्रदान झालेली रक्कम वसुलीबाबत आक्षेप आल्यास आक्षेपाधीन रक्कमेचा परतावा पुरवठादार यांनी करणे बंधनकारक राहील.

२१. सेवा पुरवठाधारकांनी गणवेश २ नग, रेनकोट १ नग व ओळखपत्र नग १, हॅण्डग्लोज २ नग, गमबुट पुरविले बाबतची कामगारांची पोच पहिल्या बिलासोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर गणवेश, रेनकोट व ओळखपत्र कर्मचाऱ्यांनी कामावर असताना वापरणे बंधनकारक आहे.

२२. सेवा पुरविणे कामामध्ये सेवा पुरविताना अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील.

२३. अमलात असलेल्या कामगार कायद्यांची पूर्तता करणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

२४. दररोज कामांसंबंधी अहवाल विभाग प्रमुख यांचेकडे सायंकाळी ६.०० वाजता सादर करणे बंधनकारक राहील.

२५. आपत्कालीन परिस्थितीत दैनंदिन कामे स्थगित करून नगर परिषद निर्देश देईल ती कामे पुर्ण करावी लागतील.

२६. ठेकेदार यांचे कामावरील मजुरांनी नगर पालिकेविरूध्द बदनामीकारक वृत्त प्रसिध्द केल्यास होणारे बदनामीबाबत सर्वस्वी ठेकेदार यांना जबाबदार धरणेत येईल व नगर परिषद ठरवेल तो दंड ठेकेदार यांचेकडून वसुल करणेत येईल.

२७. सेवा पुरवठादार यांनी सेवा पुरविताना हलगर्जीपणा केल्यास याबाबत जास्तीत जास्त २ वेळा सुधारणा करणेसंबंधी संधी देण्यात येईल व त्यानंतर सुधारणा न झाल्यास एकतर्फी ठेका रद्द करण्याचा अधिकार नगर परिषदेला असेल व त्यामूळे होणारे नगर परिषदेचे आर्थिक नुकसान ठेकेदारांच्या सुरक्षा अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०,१५१,१५२,१५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

२८.सेवा संबंधी कोणतीही तक्रार असल्यास तक्रारीचे निवारण पुरवठादार यांनी करावयाचे आहे. तसेच याबाबतीत चौकशी व पाहणीमध्ये ठेकेदार दोषी आढळल्यास मुख्याधिकारी ठरवतील तेवढी सेवेची रक्कम बिलातून कापून घेण्यात येईल.

२९.सेवा पुरवठादार यांचे कामासंबंधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास यांबाबत नगर परिषदेचा निर्णय बंधनकारक असेल. ठेका रद्द करण्याचा अधिकार नगर परिषदेला असेल व त्यामुळे होणारे नगर परिषदेचे आर्थिक नुकसान ठेकेदारांच्या सुरक्षा अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०,१५१,१५२,१५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

३०.सेवा पुरवठाधारकांचे कामाचे पर्यवेक्षण उद्यान विभागामार्फत केले जाईल. तसेच सेवांचे मुल्यांकन मुख्याधिकारी यांच्यामार्फत केले जाईल.

३१.वरील अटींचा सेवा पुरवठाधारकाकडून भंग झाल्यास ठेका रद्द करून नुकसान वसूल करण्यात येईल.

३२.सदर सेवा ठेकेदाराने कामाचा आदेश मिळाल्यापासून ११ महिने मंजूर दरानुसार पुरवावयाची आहे. नगर परिषदेने मुदतवाढ दिल्यास मुदतवाढीच्या कालावधीमध्ये मंजूर दराप्रमाणे सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

३३.निविदाधारक यांनी अंदाजपत्रकानुसारच कामगारांना दयावयाचे वेतन व विशेष भत्ते व इतर लाभ अदा करावयाचे आहेत. निविदा कमी दराची सादर केल्यास कामगारांना दयावयाचे वेतन व लाभांमध्ये कपात करता येणार नाही.

३४.सादर केलेल्या निविदेनुसार कमी/अधिक दर हे फक्त ठेकेदाराच्या नफ्यावर असेल अंदाजपत्रकीय रक्कमेवर असणार नाहीत.

३५.कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद, चिपळूण जि. रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे. ई निवीदा सादर केल्यानंतर कोणत्याही टप्यांमध्ये सादर केलेली निवीदा रद्द करणेसाठी मागणी केल्यास संबंधीत कामासाठी भरणा केलेली निवीदा बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. तसेच संबंधित यंत्रणेकडे कळविणेत येईल.

३६.निविदासंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय नगर परिषदेचा राहिल.

३७.न्यायालयीन क्षेत्र चिपळूण, जि. रत्नागिरी राहिल.

**मुख्याधिकारी**
**चिपळूण नगर परिषद**

Signature Not Verified
Digitally signed by DEEPAK LAXMAN NIMBALKAR
Date: 2026.05.12 09:43:52 IST
Location: Maharashtra-MH